मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडच्या मालमत्ता कर प्रणालीची दखल

## मालमत्ता कर प्रणालीचा नवी मुंबई महापालिकेकडून अभ्यास, उपायुक्त सचिन पवार यांनी केले मार्गदर्शन...

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक प्रभावी, पारदर्शक आणि महसूलवृद्धीस चालना देण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने आज पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाला भेट दिली. यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी या शिष्टमंडळाला पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मालमत्ता कर प्रणालीची सविस्तर माहिती दिली.



पिंपरी चिंचवड महापालिकेचे उपायुक्त सचिन पवार यांनी मालमत्ता कर व्यवस्थापनातील विविध प्रक्रिया, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच तंत्रज्ञानाधारित प्रणालींबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, मालमत्ता कर व्यवस्थापन अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका सातत्याने प्रयत्नशील आहे. डिजिटल प्रणाली, जीआयएस सर्वेक्षण आणि कार्यक्षम महसूल व्यवस्थापनाच्या माध्यमातून सेवा अधिक परिणामकारक करण्यावर आमचा भर आहे. विविध महापालिकांमध्ये अशा अभ्यासभेटी आणि अनुभवांची देवाणघेवाण झाल्यास प्रशासनातील उत्तम पद्धती एकमेकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे महसूल व्यवस्थापन अधिक सक्षम होण्याबरोबरच नागरिकांना अधिक सुलभ, विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते. स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकमेकांच्या यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्यांचा अवलंब करणे ही सकारात्मक आणि विकासाभिमुख प्रक्रिया आहे, असेदेखील त्यांनी सांगितले.

यावेळी नवी मुंबई महापालिकेच्या शिष्टमंडळाने मालमत्ता कर आकारणीची कार्यपद्धती, सर्वेक्षण व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया, लेटिंग रेट निर्धारण, महसूलवाढीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम, जनजागृती मोहिमा तसेच डिजिटल प्रणालींच्या वापराबाबत विशेष माहिती जाणून घेतली. तसेच जीआयएस आधारित सर्वेक्षण, थकबाकी वसुलीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देण्यात आली.

या अभ्यासभेटीमुळे दोन्ही महापालिकांमध्ये प्रशासनातील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण होऊन अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानाधारित आणि नागरिकाभिमुख कर व्यवस्थापनाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

---

# आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय कार्यालय स्तरावर पूर नियंत्रण कक्षाची स्थापना...

## पूरनियंत्रण, बचावकार्य, मदत शिबिरे, आरोग्य सुविधा व आपत्कालीन प्रतिसादासाठी "मान्सून कृती आराखडा 2026" कार्यान्वित

**पिंपरी | प्रतिनिधी**

मान्सून कालावधीत संभाव्य अतिवृष्टी, पाणी साचणे आणि पूरजन्य परिस्थितीवर तातडीने नियंत्रण ठेवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर २४X७ पूर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.या नियंत्रण कक्षांमुळे नागरिकांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद देणे, आपत्कालीन परिस्थितीचे समन्वय साधणे आणि आवश्यक मदतकार्य तत्काळ पोहोचवणे शक्य होणार आहे. यासाठी नियंत्रण कक्षांमध्ये आवश्यक मनुष्यबळ, सुसज्ज संप्रेषण व्यवस्था तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे मान्सून काळात शहरातील पूर व्यवस्थापन अधिक प्रभावी, जलद आणि समन्वयित पद्धतीने पार पाडणे सुलभ होणार आहे.




आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पूरस्थिती, अतिवृष्टी तसेच आपत्कालीन परिस्थितींना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने "मान्सून कृती आराखडा २०२६" तयार केला असून सर्व विभागांना समन्वयाने काम करून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांची सुरक्षितता, पूरनियंत्रण, तात्काळ मदत, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा सक्षम करण्यावर या आराखड्यात विशेष भर देण्यात आला आहे.

### विसर्गावर सतत देखरेख ठेवण्याच्या सूचना..

» पवना, मुळशी व इतर धरणांमधील पाणीसाठा आणि विसर्ग याबाबतची माहिती नियमितपणे घेऊन परिस्थितीनुसार संबंधित विभागांना सतर्क करण्यात येणार आहे. धरण विसर्ग वाढल्यास नदीकाठच्या भागांमध्ये तातडीने सूचना देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### क्षेत्रीय कार्यालयांना सतर्कतेच्या सूचना..

» सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी पूरबाधित व सखल भागांची पाहणी करून संभाव्य धोक्याच्या ठिकाणांची नोंद करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नदीकाठ, नाले, पाणी साचणारी ठिकाणे आणि पूरप्रवण भागांमध्ये विशेष दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# पिंपळे सौदागर येथील टेस्ट ऑफ इंदौरच्या कारखान्याला भीषण आग

## गॅस सिलेंडर साठ्यामुळे वाढली भीती; अग्निशमन दलाच्या तत्परतेने टळली मोठी दुर्घटना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील शिवार चौक ते कुणाल आयकॉन रोडवरील अत्यंत वर्दळीच्या भागात असलेल्या टेस्ट ऑफ इंदौर या कारखान्याला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने परिसरात नागरिकांची मोठी पळापळ उडाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झाली नसली, तरी काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणात उसळत असल्याने स्थानिक नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

दरम्यान, या घटनेत एक धक्कादायक बाब समोर आली असून, ज्या ठिकाणी आग लागली त्या परिसरात काही गॅस सिलेंडर साठवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. सध्या सर्वसामान्य नागरिकांना गॅस टंचाईचा सामना करावा लागत असताना व्यावसायिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर सिलेंडरचा साठा कसा ठेवण्यात आला, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, जर आगीत सिलेंडरचा स्फोट झाला असता तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. संबंधित परिसर हा अत्यंत रहदारीचा असल्याने अशा ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून कारखाने चालवले जात असल्याबद्दल संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशांकडून करण्यात येत आहे.



### सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीची मागणी

» या घटनेनंतर पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांनी प्रशासनाकडे सुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. व्यावसायिक आस्थापनांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा कार्यरत आहे का, गॅस साठवण नियमांचे पालन केले जाते का, याची नियमित तपासणी करण्याची गरज व्यक्त होत आहे. तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासन, अग्निशमन विभाग आणि व्यावसायिकांनी संयुक्तपणे अधिक सतर्क राहण्याची गरज अधोरेखित होत आहे.

### अग्निशमन दलाच्या तत्परतेने टळली दुर्घटना

» पिंपळे सौदागर येथील 'टेस्ट ऑफ इंदौर' कारखान्याला लागलेल्या भीषण आगीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणात उसळत असल्याने स्थानिक नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी त्वरित धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा दुखापत झाली नाही. मात्र, ही घटना शहरातील व्यावसायिक भागांमध्ये अग्निसुरक्षेचे नियम अधिक काटेकोरपणे पाळण्याची गरज अधोरेखित करणारी ठरली आहे.

### गॅस सिलेंडर साठ्यामुळे वाढली चिंता

» आग लागलेल्या परिसरात मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडर साठवून ठेवण्यात आल्याची माहिती समोर आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. सामान्य नागरिकांना गॅस टंचाईचा सामना करावा लागत असताना व्यावसायिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात सिलेंडर साठवले जात असल्याबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. स्थानिकांच्या मते, सिलेंडरचा स्फोट झाला असता तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. रहदारीच्या ठिकाणी सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे प्रशासनाने अशा प्रकारांवर कठोर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# वाकड पुलाचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करा

## नगरसेविका श्रुती वाकडकर यांचे पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड परिसरातील बेंगळुरू–मुंबई महामार्गावरील वाकड पुलाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडल्याने परिसरात तीव्र वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीच्या पार्श्वभूमीवर नगरसेविका तथा पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण समिती सदस्य श्रुती राम वाकडकर यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन देत पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

सध्या सकाळी आणि संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत वाकड, पुनावळे, ताथवडे, हिंजवडी आणि परिसरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. याचा फटका कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, रुग्णवाहिका तसेच सर्वसामान्य नागरिकांना बसत असून प्रवाशांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत आहे.

वाहतूक सुरळीत करण्याच्या उद्देशाने वाकड पुलाचे काम सुरू करण्यात आले होते. मात्र काम अपूर्ण राहिल्यामुळे वाहतुकीचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. त्यामुळे रखडलेले काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावे, तसेच काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक व्यवस्थापनासाठी तात्पुरत्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, आयुक्तांनी या समस्येची तातडीने दखल घेत संबंधित विभागाला आवश्यक सूचना दिल्याची माहिती मिळाली आहे.



### कार्यालयीन नागरिकांना मोठा फटका

» वाकड पुलाचे काम रखडल्यामुळे वाकड, पुनावळे, ताथवडे आणि हिंजवडी परिसरात वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत आहे.

# पुणे महापालिकेच्या नोकर भरतीच्या आदेशावर आता 'क्यूआर कोड'!

## नोकरभरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि फसवणूक रोखण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प १५ हजार कोटींच्या घरात गेला आहे. महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमुळे शहराचे क्षेत्रफळ देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहे. नागरिकांना आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवण्यासाठी महापालिकेकडे उपलब्ध असलेले कर्मचारी, अधिकारी वर्ग यांची संख्या कमी आहे. मागील काही वर्षांपासून महापालिकेत नोकर भरती न झाल्याने अनेक पदेही रिक्त आहेत.

महापालिकेत रिक्त असलेल्या पदांचा गैरफायदा घेत महापालिकेत नोकरीला लावतो असे आमिष दाखवून सर्वसामान्य नागरिकांचे लाखो रुपयांची फसवणूक करत असल्याचे प्रकार घडत आहेत. काही दिवसांपूर्वी पालिकेत नोकरीच्या निमित्ताने उमेदवारांचे फसवणूक करण्याचे प्रकरण समोर आले होते. या प्रकरणाचे तक्रार थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. त्यानंतर महापालिकेत झालेल्या या कथेत भरती प्रकरणाची चौकशी सुरू झाली आहे.




महापालिकेत कंत्राटी पद्धतीने तसेच कायमस्वरूपी अशा कोणत्याही प्रकारची नोकरभरती करताना यापुढील काळात प्रत्येक आदेशावर 'क्यूआर कोड ' देण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. महापालिकेत नोकरी लावण्याच्या बहाण्याने होत असलेल्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

'येत्या ५ जून पासून याची अंमलबजावणी केली जाणार आहे. नोकर भरतीच्या कोणत्याही आदेशावर क्यूआर कोड छापले जाणार आहेत. त्यामुळे फसवणूक टाळली जाणार आहे. प्रत्येकाला क्यूआर कोड स्कॅन करून आदेशाची सत्यता तपासता येणार आहे,' असे महापालिकेचे अतिरिक्त महापालिका आयुक्त प्रजित नायर यांनी सांगितले.

### भरती प्रक्रियेत पारदर्शकतेवर भर

**» पुणे महापालिकेने नोकरभरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. यापुढे कंत्राटी तसेच कायमस्वरूपी भरतीसाठी जारी होणाऱ्या प्रत्येक आदेशावर 'क्यूआर कोड' देण्यात येणार आहे. नागरिकांना हा कोड स्कॅन करून आदेशाची सत्यता तपासता येणार असल्याने बनावट नियुक्तीपत्रे आणि फसवणुकीच्या प्रकारांना मोठा आळा बसणार आहे. ५ जूनपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार असून, भरती प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर प्रशासनाकडून डिजिटल ट्रॅकिंगही केले जाणार आहे. या उपक्रमामुळे नोकरभरती अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

### बनावट भरतीप्रकरणांवर प्रशासनाची कठोर भूमिका

**» महापालिकेच्या बोधचिन्हाचा आणि अधिकाऱ्यांच्या बनावट सह्यांचा वापर करून नागरिकांची फसवणूक होत असल्याच्या घटनांनंतर प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर कारवाई करण्यासाठी भरती आदेशांमध्ये डिजिटल पडताळणी प्रणाली लागू केली जात आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः नोकरीच्या शोधात असलेल्या युवकांना सुरक्षित आणि अधिकृत प्रक्रियेबाबत स्पष्टता मिळणार असून, फसवणुकीच्या घटना कमी होण्यास मदत होणार आहे.**

### वाढत्या शहरासाठी मनुष्यबळाची गरज

**» पुणे महानगरपालिकेचा अर्थसंकल्प १५ हजार कोटींच्या घरात पोहोचला असून, नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमुळे शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासनाला अधिक मनुष्यबळाची आवश्यकता भासत आहे. अनेक पदे रिक्त असल्याने महापालिकेवर कामाचा ताण वाढला आहे. त्यामुळे आगामी काळात पारदर्शक आणि सुरक्षित पद्धतीने नोकरभरती प्रक्रिया राबविण्याचा प्रशासनाचा प्रयत्न महत्त्वाचा मानला जात आहे. डिजिटल प्रणालीच्या वापरामुळे प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक मजबूत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

# 'एनडीए'च्या दीक्षांत संचलनात यंदा 'सारंग'च्या कसरती

## दररोज 100 किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांवर महापालिकेची कारवाई; ऑनसाईट प्रक्रिया न करणाऱ्यांची होणार तपासणी

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) ऐतिहासिक १५०व्या अभ्यासक्रमाच्या दीक्षांत समारंभानिमित्त 'सारंग' हेलिकॉप्टर डिस्प्ले टीमकडून 'एनडीए'च्या आकाशात थरारक हवाई कसरती सादर केल्या जाणार आहेत. महिला कॅडेट्सच्या तिसऱ्या पदवीधर तुकडीचाही या संचलनात समावेश असल्याने येत्या शुक्रवारी (२९ मे) होणारा यंदाचा समारंभ विशेष महत्त्वाचा ठरणार आहे.

दरम्यान, यंदा प्रथमच पाच हेलिकॉप्टरच्या फॉर्मेशनमधून 'डायमंड', 'कॉसओव्हर' तसेच प्रसिद्ध 'सारंग स्प्लिट' यांसारख्या कसरती सादर केल्या जाणार आहेत. 'एनडीए' मधील 'सुदान ब्लॉक' आणि 'सलारिया स्क्वेअर' परिसरात या हवाई कसरती होतील. या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर 'सारंग' हेलिकॉप्टर टीमने बुधवारी पत्रकारांशी संवाद साधला. स्क्वाड्रन लीडर निशांक अवस्थी, अजित सिंग, निदर्शना शर्मा या वेळी उपस्थित होत्या.



'ॲडव्हान्स्ड लाईट हेलिकॉप्टरच्या मूल्यमापन उड्डाणातून या टीमची सुरुवात झाली. २००४ मध्ये तिला 'सारंग' हे नाव देण्यात आले. संस्कृतमधील 'सारंग' म्हणजे मोर. आमच्या कसरतींतील देखणेपणा आणि लयबद्धतेचे ते प्रतीक आहे. 'दुबई एअर शो' मध्ये 'सूर्यकिरण' टीमबरोबर केलेले संयुक्त सादरीकरण हा आमच्यासाठी महत्त्वाचा टप्पा होता,' असे अवस्थी यांनी सांगितले.

अजित सिंग म्हणाले, 'पूर्वी आमचे फॉर्मेशन चार हेलिकॉप्टरचे होते. आता त्यात पाचवे हेलिकॉप्टर समाविष्ट करण्यात आले आहे. गेल्या काही महिन्यांपासून आम्ही या नव्या फॉर्मेशनवर काम करीत आहोत. 'डायमंड' आणि 'क्रॉसओव्हर' सारख्या कसरती आता पाच हेलिकॉप्टरसह सादर केल्या जातील. 'सारंग हार्ट' मध्ये दोन हेलिकॉप्टर आकाशात हृदयाची आकृती तयार करतात आणि तिसरे हेलिकॉप्टर त्यातून बाणासारखे झेपावते. 'सारंग स्प्लिट' या अंतिम कसरतीतही आता पाच हेलिकॉप्टर सहभागी होतील.'

### सारंग स्प्लिट' ठरणार आकर्षण

**» राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १५०व्या अभ्यासक्रमाच्या दीक्षांत समारंभात यंदा 'सारंग' हेलिकॉप्टर डिस्प्ले टीमच्या थरारक कसरती विशेष आकर्षण ठरणार आहेत. प्रथमच पाच हेलिकॉप्टरच्या फॉर्मेशनमधून 'डायमंड', 'क्रॉसओव्हर' आणि प्रसिद्ध 'सारंग स्प्लिट' यांसारख्या कसरती सादर केल्या जाणार आहेत. एनडीएच्या 'सुदान ब्लॉक' आणि 'सलारिया स्क्वेअर' परिसरातील आकाश या हवाई सादरीकरणाने दणाणून जाणार आहे. भारतीय हवाई दलाच्या कौशल्याचे आणि शिस्तीचे दर्शन घडवणाऱ्या या कसरती पाहण्यासाठी उपस्थितांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.**

# बारामतीत वाहतूक कोंडीचा कहर; अनधिकृत अतिक्रमणामुळे नागरिक त्रस्त

## कसबा चौक ते रिंगरोडपर्यंत वाहतूक ठप्प; जड वाहनांमुळे आणि पदपथ अतिक्रमणामुळे परिस्थिती गंभीर

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती शहर, उपनगर आणि एमआयडीसी परिसरात वाढत्या अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे आणि जड वाहनांच्या वर्दळीमुळे वाहतुकीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील प्रमुख चौक आणि रस्त्यांवर दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत असून, नागरिकांचा अक्षरशः श्वास कोंडला जात आहे

शहरातील मुख्य रस्त्यांवर सर्रास वाहन पार्किंग होत असल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. कसबा चौक, गुणवडी चौक, गांधी चौक, इंदापूर चौक, तीन हत्ती चौक, पंचायत समिती चौक, सातव चौक, पेन्सिल चौक, सूर्यनगरी परिसर तसेच रिंगरोडवर सकाळी आणि सायंकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.

वाहनांची संख्या झपाट्याने वाढत असताना पार्किंग व्यवस्थेचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. गणेश भाजी मंडई येथील वाहनतळ सुरू होऊनही शहरातील पार्किंगचा प्रश्न सुटलेला नाही. ठिकठिकाणी रस्त्यावरच वाहने उभी केली जात असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणे आणि हातगाड्यांमुळेही अडथळा येत आहे. फुटपाथवर विक्रेत्यांनी बस्तान मांडल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागते. परिणामी, अपघाताचा धोका वाढला आहे.

शहरातून जड वाहनांना बंदी असतानाही अनेक अवजड वाहने शहरातूनच ये-जा करतात. वाहतूक कोंडीमुळे रुग्णवाहिकांनाही मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. निवडणुका संपल्यानंतर नगरपालिका प्रशासन, पोलिस विभाग आणि आरटीओ यांनी संयुक्त कारवाई करून अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे आणि नियमबाह्य वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याची मागणी बारामतीकरांकडून होत आहे. भविष्यात शहराची लोकसंख्या आणि वाहनसंख्या वाढणार असल्याने कायमस्वरूपी वाहतूक आराखडा राबविण्याची गरज आहे.

हातगाडे, व्यावसायिक आणि अनधिकृत विक्रेत्यांनी पदपथ व्यापल्याने नागरिकांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, वाहतुकीतही अडथळे निर्माण होत आहेत. अपघात रोखण्यासाठी यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील वाहतूक नियंत्रणासाठी नगरपालिका, पोलिस आणि आरटीओ प्रशासनाने अधिक सक्रिय होण्याची गरज आहे.



### संयुक्त कारवाईची नागरिकांची अपेक्षा

**» अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे आणि जड वाहनांच्या वर्दळीमुळे निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय म्हणून नगरपालिका, पोलीस विभाग आणि आरटीओ यांनी संयुक्त कारवाई करावी, अशी मागणी बारामतीकरांकडून होत आहे. शहरातून जड वाहनांच्या वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण आणणे, नियमबाह्य पार्किंगवर दंडात्मक कारवाई करणे आणि वाहतूक नियोजन अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. नागरिकांच्या सहकार्याने आणि प्रशासनाच्या समन्वयातून बारामतीची वाहतूक व्यवस्था अधिक सुटसुटीत आणि सुरक्षित होऊ शकते.**

### पदपथ मोकळे करण्याची गरज

**» बारामतीतील अनेक पदपथांवर हातगाडे, विक्रेते आणि अनधिकृत अतिक्रमणांमुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढत असून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः बाजारपेठ आणि गर्दीच्या परिसरात नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पदपथ नागरिकांसाठी सुरक्षित आणि मोकळे ठेवण्यासाठी प्रशासनाने नियमित मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे. यामुळे शहरातील वाहतूक शिस्त सुधारण्यास आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेस मदत होणार आहे.**

### वाढती वाहनसंख्या ठरतेय आव्हान

**» बारामती शहरात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. प्रमुख चौकांमध्ये सकाळ आणि सायंकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणात कोंडी होत असून नागरिकांना वेळेचा आणि इंधनाचा मोठा फटका बसत आहे. गणेश भाजी मंडई येथील वाहनतळ सुरू होऊनही पार्किंगची समस्या कायम आहे. त्यामुळे शहरासाठी आधुनिक आणि नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था उभारण्याची मागणी जोर धरत आहे. भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता वाहतुकीसाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.**

# मोरगाव बसस्थानकात सुविधांचा अभाव; प्रवाशांचे हाल सुरूच

## पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह आणि दिवाबत्ती बंद; प्रवाशांकडून नाराजी वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती तालुक्याच्या पश्चिम जिरायत भागातील अष्टविनायकाचे आद्य तीर्थक्षेत्र असलेल्या मोरगाव येथील बसस्थानकात पायाभूत सुविधांचा प्रचंड अभाव असल्याने प्रवाशांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या बसस्थानकातून बारामती आगारासह इतरही अनेक आगारांच्या बसगाड्या नियमित धावतात. दररोज येथे हजारो भाविक, प्रवासी, शाळकरी विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक येत असतात. मात्र, मूलभूत सोयींअभावी या सर्वांनाच मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे

बसस्थानकातील स्वच्छतागृह दीर्घकाळापासून कुलूपबंद अवस्थेत आहे. लांब पल्ल्याच्या बसगाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांना, विशेषतः महिलांना यामुळे उघड्यावर शौचास जावे लागत आहे. यामुळे महिलांची मोठी कोंडी होत असून, त्यांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, काही समाजकंटकांनी स्वच्छतागृहाच्या भिंतींचे नुकसान करून आतील साहित्याची मोडतोड केल्याचेही समोर आले आहे. सार्वजनिक मालमत्ता ही आपलीच समजून सर्वांनी तिची काळजी घेणे गरजेचे आहे, असे मत सुजाण नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

तीर्थक्षेत्राचे ठिकाण असूनही बसस्थानकात प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नाही. उन्हाळ्यात व इतर ऋतूंमध्येही प्रवाशांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. याशिवाय, गेल्या एक महिन्यापासून बसस्थानकातील दिवाबत्तीची (लाइट्स) सोय पूर्णपणे बंद आहे. रात्रीच्या वेळी संपूर्ण बसस्थानकात सर्वत्र अंधार असतो, ज्यामुळे सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे

मोरगाव बसस्थानकातील या सर्व गंभीर समस्यांबाबत बारामतीचे आगारप्रमुख प्रवीण शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागामार्फत युद्धपातळीवर सुविधा पूर्ववत केल्या जातील, असे आश्वासन दिले आहे.



### आगारप्रमुखांचे आश्वासन

**» मोरगाव बसस्थानकातील या सर्व गंभीर समस्यांबाबत बारामतीचे आगारप्रमुख प्रवीण शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागामार्फत युद्धपातळीवर सुविधा पूर्ववत केल्या जातील, असे आश्वासन दिले आहे. आता या आश्वासनाची प्रत्यक्षात पूर्तता कधी होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.**